# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/12/2022 (मंगळवार) दुपार

---

## पोलीस भरती—२०२१ च्या संकेतस्थळावर तृतीयपंथातील व्यक्तीसाठी पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत.

**पोलीस भरती—२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, बॉम्बे यांनी तृतीयपंथातील व्यक्तीसाठी पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक ०९ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पोलीस भरती—२०२१ मध्ये policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावर तृतीयपंथातील व्यक्तीसाठी पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदरचा पर्याय पोलीस शिपाई व पोलीस शिपाई चालक या पदासाठी दिनांक १३.१२.२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.**

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०.५ कि.मी. अंतरावर केमीकल ग्राउंड कन्हान येथे दिनांक १२/१२/२०२२ चे १२.०० वा. ते २२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— पोलीस नाईक ब. नं. ४१४ शैलेश राजाराम वराडे पोलीस स्टेशन कन्हान हे पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस पथकासह केमीकल ग्राउंड कन्हान जवळ गस्त पेट्रोलिंग डयुटी करीत असता गुप्त बातमिदारांकडुन माहिती मिळाली की, एक इसम तलवार घेवुन फिरत आहे अशा मिळालेल्या माहिती वरुन घटनास्थळी गेले असता एक इसम तलवार घेवुन दिसुन आला सदर इसमाचा घेराव करुन त्याला ताब्यात घेतले असता आरोपी विधीसंघर्ष बालक वय १९ वर्ष, रा. पिपरी ग्रामपंचायत च्या मागे कन्हान त्या इसमाला तलवारी बाबत विचारले असता त्या इसमाने समाधानकारक उत्तर न दिल्याने त्या आरोपीला पोस्टे ला आणुन त्याचा विरोधात सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्टवरून पोस्टे. कन्हान येथे आरोपिविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अरुण सहारे ब.न ३५६ पोस्टे कन्हान मो. नं. ९३०९५९२५१२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर